Government of Maharashtra
Maharashtra State Council of Educational Research and Training
(Academic Authority)
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938,24475571
Website : www.maa.ac.in
E-Mail : preserviceedudept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या प्राधिकरण) पुणे
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०) 24476938, 24475571
वेबसाईट : www.maa.ac.in
ईमेल: preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र. सेवापूर्व शिक्षण/२०१८/ 2800 — दिनांक : १९.६.२०१८ 20

प्रति,

**प्राचार्य,**
**जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सर्व)**

**विषय :- डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश २०१८-१९ मुदतवाढीबाबत......**
**संदर्भ :-१)या कार्यालयाचे पत्र जा.क्र. २५८५ दिनांक ४.६.२०१८**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ अन्वये डी.एल.एड. प्रथम वर्षाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. ४.६.२०१८ पासून सुरु झालेली असून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि. २०.६.२०१८ ठेवण्यात आली होती.

तथापि ती दिनांक ३०.६.२०१८ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. फेरीनिहाय वेळापत्रक, विद्यार्थ्यांनी विकल्प भरण्याचे दिनांक प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांनी अध्यापक विद्यालयनिहाय प्रवेशाचा आढावा घेणे इत्यादी बाबतच्या तारखा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

ऑनलाईन अर्ज भरणेबाबतचे प्रसिध्दी निवेदन सोबत जोडले आहे. ते आपल्या जिल्हयातील वर्तमानपत्रात विनामूल्य प्रसिध्द करण्याबाबत कळवावे. तसेच सदरचे प्रसिध्दी निवेदन (१) जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (२) पडताळणी केंद्रे (३) जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावेत.

(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या प्राधिकरण) पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

**प्रत कार्यवाहीसाठी**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. पडताळणी अधिकारी, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सर्व)

Government of Maharashtra
Maharashtra State Council of
Educational Research and Training
(Academic Authority)
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938,24475571
Website : www.maa.ac.in
E-Mail : preserviceedudept@maa.ac.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, (विद्या प्राधिकरण) पुणे
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०) 24476938, 24475571
वेबसाईट : www.maa.ac.in
ईमेल: preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र. सेवापूर्व शिक्षण/२०१८/ दिनांक : १९.६.२०१८

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक .............**

**विषय :- प्रसिध्दी निवेदन विनामूल्य प्रसिध्द करणेबाबत......**

**महोदय**

या पत्रासोबतचे डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश २०१८-१९ प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढीबाबतचे प्रसिध्दी निवेदन आपल्या लोकप्रिय दैनिकातून विनामूल्य प्रसिध्द करण्यात यावे.

**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय डी.एल.एड.प्रवेश निवड,निर्णय व**
**प्रवेश सनियंत्रण समिती, पुणे**

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे
## प्रसिध्दी निवेदन

**विषय :- प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D.El.Ed) प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश २०१८-१९ मुदतवाढीबाबत......**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D.El.Ed) प्रथम वर्ष ऑनलाईन (शासकीय कोटा) प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दिनांक २०.६.२०१८ रोजी पर्यंत मुदत ठेवण्यात आली होती. सदर अर्ज भरण्यासाठी दिनांक ३०.६.२०१८ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याबाबतच्या सर्व सूचना, प्रवेश पात्रता इत्यादी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) च्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन अर्ज भरल्यानंतरचे फेरीनिहाय सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध असेल, यासाठी संबंधितांनी वेळोवेळी संकेतस्थळ पहावे.

**(डॉ. सुनिल मगर)**
**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय डी.एल.एड.प्रवेश निवड,निर्णय व प्रवेश सनियंत्रण समिती, पुणे**
**तथा**
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे**

## डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक २०१८-१९
## (शासकीय कोटा)

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | दि. ४.६.२०१८ ते ३०.०६.२०१८ (सायं. ६.०० वाजेपर्यंत) |
| २ | उमेदवारांनी पडताळणी केंद्रावर ऑनलाईन आवेदन पत्राची पडताळणी करुन घेणे. | दि.५.०६.२०१८ ते ०१.०७.२०१८ |
| ३ | सर्वसाधारण गुणवत्ता यादी व आक्षेप नोंदणी संधी | दि.०३.०७.२०१८ (सायं. ६.०० वाजेपर्यंत) |
| ४ | अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्दि करणे. | दि.०४.०७.२०१८ (दु.१२.०० वाजता) |
| ५ | प्रथम फेरी प्रवेशाची यादी जाहीर करणे. | दि.०५.०७.२०१८ |
| ६ | प्रथम फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.०५.०७.२०१८ ते ०९.०७.२०१८ |
| ७ | पहिल्या फेरीतील सर्व ऑनलाईन प्रवेश प्राचार्यांनी त्यांच्या Login मधून Online Admit करुन प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी DIECPD च्या Email वर पाठविणे | दि.०९.०७.२०१८ |
| ८ | दुसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राहय धरले जातील. | दि.१०.०७.२०१८ |
| ९ | दुसरी प्रवेश फेरी यादी प्रसिध्द करणे. | दि.११.०७.२०१८ |
| १० | दुसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारांनी प्रवेश घेणे. | दि.११.०७.२०१८ ते १४.०७.२०१८ |
| ११ | दुसऱ्या फेरीतील सर्व ऑनलाईन प्रवेश प्राचार्यांनी त्यांच्या Login मधून Online Admit करुन प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी DIECPD च्या Email वर पाठविणे | दि. १४.०७.२०१८ |
| १२ | तिसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राहय धरले जातील. | दि.१५.०७.२०१८ |
| १३ | तिसरी व अंतिम प्रवेश फेरी यादी प्रसिध्द करणे. | दि.१६.०७.२०१८ |
| १४ | तिसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारांनी प्रवेश घेणे. | दि.१६.०७.२०१८ ते १९.०७.२०१८ |
| १५ | सर्व ऑनलाईन प्रवेश प्राचार्यांनी त्यांच्या Login मधून Online Admit करुन प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी DIECPD च्या Email वर पाठविणे | दि. १९.०७.२०१८ |
| १६ | DIECPD प्राचार्यांनी जिल्हयातील अध्यापक विद्यालय निहाय झालेल्या प्रवेशाची पडताळणी करुन घेणे | दि.२०.०७.२०१८ |
| १७ | प्रथम वर्ष सुरु दिनांक | दिनांक १६ जुलै २०१८ |

टिप :- प्रत्येक फेरी प्रवेश यादी (Allottment) जाहीर झाल्यापासून उपरोक्त ठरवून दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.